वेध : आंबेडकरी विचार-व्यवहाराचा

डॉ. आंबेडकरांची अल्पसंख्याकविषयक भूमिका

फकरुद्दीन बेन्नूर

भारतात ब्रिटिशांच्या वसाहतवादी आक्रमणानंतर १९०० पासून 'अल्पसंख्याकां'च्या संकल्पनेने जोर धरला आणि 'अल्पसंख्याक' ही स्वातंत्र्यपूर्व भारतातील राजकीय आंदोलनातील एक प्रमुख समस्या बनली. ब्रिटिशपूर्व भारतात अशी समस्या आणि विभिन्नधर्मीय जमाती, जाती, भाषिक आणि सांस्कृतिक किंवा प्रादेशिक जमाती यांच्यामध्ये अशी विभागणी नव्हती. भारतांत बौद्धधर्मीय, जैनधर्मीय, वीरशैव लिंगायत, शैव, वैष्णव, कबीरपंथीय, शीखधर्मीय, झरत्रुष्टधर्मीय, ख्रिस्ती, इस्लामधर्मीय, धर्म आणि संप्रदाय होते. भाषिक-वांशिक जमाती होत्या. जंगलनिवासी वन्य जमाती, त्यांचे त्यांचे प्राचीन आणि स्थानिक धार्मिक आचार होते. श्रमण आणि शाक्त परंपरा, वैदिक धर्म आणि त्यांच्या श्रद्धा आणि देवदेवता होत्या. 'मुसलमान' हे धर्माच्या नावाने ओळखले जात नव्हते. त्यांना अरब, तुर्क, मोगल, पठाण, बलुची, ताजिकी, अझबैगी, मकागाणी, इराणी, तुराणा इत्यादी वांशिक नादाने ओळखले जाई. मूळ इतिहासात (वसाहतवादी आणि ब्राह्मणी सोडून) त्यांचे वर्णन तसेच आहे. सर सय्यदसारख्या वरिष्ठवर्णीय अशरफ वर्गाचे राजकारण सुरू होईपर्यंत मुसलमानही आपण 'अल्पसंख्य' आहोत, असा शब्दप्रयोग करीत नव्हते. भारतात 'धर्म' हा एकजीव, एकजिनसी, सर्वसमावेशक 'समूह' किंवा 'अखंड आणि एकावयवी' आचार-विचारप्रणाली म्हणून कधीच अस्तित्वात नव्हता (रिलीजन्स मोनोलिथ). भारतातील धर्माचे स्वरूप, मग बौद्ध, जैन, वैदिक, वीरशैव, शीख असो, हे बहुपेडी आणि अनेकात्म (प्लुरल) होते. प्रत्येक धार्मिक समूहात विविध परंपरा, प्रसंगी परस्परविरोधी आचार-विचार होते.

ब्रिटिशांनी आपला शोषक वसाहती राज्यकारभार सुरू केल्यानंतर भारताच्या सामाजिक रचनेत आणि वैचारिक पर्यावरणात हस्तक्षेप करून

ईमेल : pwatsaru@yahoo.com

समाजात अनेक विसंगती निर्माण केल्या. त्यांनी भारतातल्या 'धर्माचे' मोनोलियाइझेशन (म्हणजे बंदिस्त एकजिनसीकरण) केले. बंदिस्त कॅथॉलिक व प्रॉटेस्टंट ख्रिस्ती धर्म आणि ग्रंथप्रामाण्यावर आधारित चातुर्वर्ण्याधिष्ठित वैदिक धर्म यांचा 'पॅटर्न' इथल्या धार्मिक समुदायांना लावून त्यांना एका विशिष्ट धर्माच्या 'मोनोलिथ'मध्ये बंदिस्त केले. रोमिला थापर यांनी म्हटल्याप्रमाणे भौगोलिक क्रांतीनंतर आणि मार्टिन ल्यूथरच्या धर्मसुधारणा चळवळीमुळे युरोपातील प्रस्थापित समाजरचना मोडकळीस आली. जुनी ख्रिस्ती मूल्ये उद्ध्वस्त झाली. त्यामुळे तेथील विचारवंत आणि सांस्कृतिक अभिजनवर्ग एक प्रकारच्या नैराशाने ग्रस्त होता. त्याच सुमारास १७५० पासून युरोपियन विशारद भारतात आले. ब्रिटिश वसाहतवादी इतिहासकारही येत राहिले होते. त्यांनी भारत समजावून घेण्यासाठी भारतातील प्राचीन आणि मध्ययुगीन संस्कृत ग्रंथ अभ्यासण्यास सुरुवात केली. कलकत्त्याची 'एशियाटिक सोसायटी'ची स्थापना भारताच्या प्राच्यविद्याभ्यासातील 'टर्निंग पॉईंट' होता. मॅक्समुल्लर, विल्यम जोन्स आदी अभ्यासकांनी कालिदास, बाणभट्ट, भवभूती, वेद, उपनिषदे, भगवद्गीता यांच्या अभ्यासातून असा निष्कर्ष काढला की, भारतात प्राचीन काळापासून 'हिंदू' (ब्राह्मणी) संस्कृतीच अस्तित्वात होती. आर्य-हिंदू हे भारताचे मूळ वंशज असून बाकीचे घुसखोर आहेत. वसाहतवादी इतिहासकारांना मुसलमान 'बाहेर'चे, उपरे दाखवायचे होते. त्यांचा क्रूसेडच्या काळापासून सर्वत्र तोच 'अजेंडा' होता. मॅक्समुल्लरसारख्या विचारवंतांनी आर्य-सिद्धान्ताचे रचित तयार करून संमिश्र आणि बहुपेडी भारतीय संस्कृतीला आर्य-हिंदू संस्कृतीचा रंग दिला. तोच विचार पुढे फ्रेंच आणि जर्मन वंशवादी विचारवंतांनी विस्तारित केला. युरोपियनांनी युरोपातील सर्व लोकसमुदायांचे ख्रिस्तीकरण केले होते. ख्रिस्ती धर्म आणि आर्यांचे श्रेष्ठत्व, हिंदू धर्म आणि हिंदू आर्यांचे श्रेष्ठत्व असे समीकरण तयार केले होते.

वास्तविक, भारतातील तथाकथित बहुसंख्याक हिंदू लोकसमुदायांचे स्वरूप परस्परविरोधी घटकांचे होते. त्यामध्ये वेगवेगळे प्राचीन धर्म किंवा धार्मिक प्रवाह, संप्रदाय, पंथ-उपपंथ, विविध प्रदेशांतील भिन्न भिन्न तळागाळांतील जमाती, अस्पृश्य ठरविल्या गेलेल्या जाती, वन्य आणि भटक्या जमाती अंतर्भूत होते. त्या सर्वांना ब्रिटिश अभ्यासकांनी 'हिंदू' या प्रवर्गात समाविष्ट केले. आपल्या ख्रिस्ती धर्माच्या आणि चातुर्वर्ण्याधिष्ठित बंदिस्त वैदिक धर्माचा 'पॅटर्न' त्यांनी त्या सर्व धार्मिक समुदायांना लावला. प्रत्येक धर्माचे 'मोनोलिथ' तयार झाले. ब्रिटिशांनी भारतातल्या विविध लोकसमुदायांना त्यांच्यातील विविधता, भेद, भिन्नता लक्षात न घेता धर्माच्या परिभाषेतच 'आयडेंटिफाय' केले. म्हणजेच त्यांनी धर्मालाच समाजरचनेचे स्वरूप दिले. विशेष म्हणजे, इथल्या धार्मिक-सांस्कृतिक वरिष्ठवर्णीय अभिजन वर्गाने धर्मग्रंथ प्रामाण्य आणि वर्णश्रमव्यवस्था यांची पोलादी चौकट तयार करून धर्माला माध्यमिक शक्तीऐवजी 'सामाजिक रचने'चे स्वरूप दिलेलेच होते. ब्रिटिशांनी मुस्लीम, ख्रिश्चन, शीख, पारशी यांनाच 'धार्मिक अल्पसंख्याक' म्हणून बाजूला काढले. बौद्ध-जैनांना हिंदूंचेच घटक म्हटले! त्यांनी भाषिक, प्रादेशिक, ईशान्येतील टोळी संस्कृती (ट्रायबल कल्चर) वन्य संस्कृतीतील जमाती यांचा विचारच केला नाही.

भारतावर व्यापाराच्या निमित्ताने आक्रमण करून सत्ता स्थापन केल्यानंतर राज्यकारभार चालवीत असताना धार्मिक कसोटीवरूनच कारभार करायला सुरुवात केली. त्यामधून असे रचित तयार झाले की, धर्म म्हणजे एक बंदिस्त 'लोकसमुदाय' असून त्याच्या गरजा, इच्छा-आकांक्षा हितसंबंध आणि एकूण स्वरूप इतर धर्मियांपेक्षा पूर्ण भिन्न असतात, इतकेच नव्हे तर, परस्परविरोधी असतात. लोकसमुदायाकडे पाहण्याचा ब्रिटिश वसाहतवादी दृष्टिकोन हा जमातवादी म्हणजे बहुसंख्य आणि अल्पसंख्याक यांच्या जमातवादी (कम्युनल-धर्मवादी) रचिताचा होता! धर्म म्हणजेच लोकसमुदाय हा होता. धर्माचा अर्थदेखील केवळ ग्रंथाधिष्ठित तत्त्वे असा होता.

स्थानिक स्वराज्य संस्थेची निर्मिती, व्हॉईसराय कौन्सिलचे प्रतिनिधी यांच्यापासूनच प्रतिनिधित्व कोणाला द्यायचे आणि कसे द्यायचे हे प्रश्न पुढे आले. ब्रिटिश प्रशासनानेच मुसलमानांना धार्मिक 'अल्पसंख्याक' म्हणून संबोधित केल्याने, मुसलमानांतील वरिष्ठवर्गीय अशरफ वर्गाने 'धार्मिक अल्पसंख्याक' म्हणून प्रतिनिधित्वाचा आग्रह धरला. हिंदहुत्ववादी संघटनांनी मुसलमानांचा धर्म 'बाहेरचा' असल्याने ते 'परकीय' असून त्यांना सत्तेत वाटा देण्याच्या बाबतीत विरोध दर्शविण्यास सुरुवात केली. ब्रिटिशांनी मुस्लीम वरिष्ठ वर्ग, नबाब, जमीनदार, तालुकदार यांना हाताशी धरून ही दरी वाढवत नेली.

१९०९ च्या मोर्ले-मिंटो सुधारणा कायद्याने धर्मनिहाय प्रतिनिधित्व आणि मतदारसंघ पक्के केले. १९१९ च्या कायद्याने तोच आराखडा विस्तारित करून धार्मिक अल्पसंख्याकत्वाचे तत्त्व संपूर्ण भारताला लागू केले. 'धर्माच्या आधारे अल्पसंख्याकत्वाचे रचित' त्यांनी तयार केल्यामुळे बहुसंख्याक आणि अल्पसंख्याक धर्म असा राजकीय संघर्ष उभा राहिला. त्यामधून धर्मनिहाय प्रतिनिधित्व मतदारसंघ, राखीव जागा, स्वतंत्र मतदारसंघ, 'वेटेज' असे गंभीर प्रश्न निर्माण झाले. अल्पसंख्याकांचा प्रश्न जटील आणि गंभीर बनला. १९१६ चा लखनौ करार, १९२८ चा नेहरू रिपोर्ट, १९४३ चा सप्रू रिपोर्ट हा प्रश्न सोडवू शकले नाहीत. त्याचे पर्यवसान भारताच्या फाळणीत झाले.

त्यामुळे स्वतंत्र भारताच्या घटनासमितीसमोर धार्मिक अल्पसंख्याक आणि सर्वात जास्त शोषित जातीय अल्पसंख्याक, म्हणजे अस्पृश्य म्हणून गणल्या गेलेल्या अल्पसंख्याकांचा प्रश्न, हे सर्वात बिकट प्रश्न होते. ते प्रश्न सोडविण्याची अंतिम जबाबदारी राज्यघटना मंडळाच्या मसुदा समितीचे अध्यक्ष डॉ. बाबासाहेब आंबेडकरांवर पडली. विशेष म्हणजे संपूर्ण घटनासमितीमध्ये भारतीय समाजरचनेची वस्तुनिष्ठ आणि शोषित घटनांची माहिती आणि जाणीव असणाऱ्या दोनच व्यक्ती होत्या, असे म्हटले तर अतिशयोक्ती होणार नाही. ते म्हणजे पं. नेहरू आणि डॉ. आंबेडकर. या दोनच व्यक्ती धर्माच्या मायाजालापासून दूर होत्या आणि खऱ्या अर्थाने धर्मनिरपेक्ष आणि मानवतावादी होत्या. डॉ. आंबेडकर तर अनंत यातना सहन करून, अपार प्रयत्नाने सर्वात जास्त शोषित आणि दडपल्या जाणाऱ्या अतिमागास अस्पृश्य जातीतून वर आले होते. त्यांच्याइतकी शोषित अल्पसंख्याकांची माहिती कोणालाही नव्हती. प्रत्यक्ष अनुभव आणि जगणे त्यांच्याजवळ होते. दुसरे पं. नेहरू होते ते नेमके दुसरे टोक होते. गर्भश्रीमंत, राजवैभवातून वर आलेले होते. परंतु अत्यंत संवेदनशील आणि खऱ्या अर्थाने धर्मनिरपेक्ष, समाजाचा आणि इतिहासाचा दांडगा अभ्यास, उत्तर भारतातील गावागावांत दौरे, भाषणे, लोकांच्या भेटीगाठी यामधून उलगडत गेलेला भारतीय समाज, तळागाळातील लोकांचे अनुभव, दारिद्र्य आणि अपवर्गन त्यांनी प्रत्यक्ष पाहिले होते. भारताच्या संमिश्र आणि सहिष्णु संस्कृतीचे अध्ययन केलेले होते. आर्थिक आणि सामाजिक न्याय साध्य करण्याची जबाबदारी या दोघांवरच आली. विशेष म्हणजे, राजकीयदृष्ट्या हे थोर नेते परस्परविरोधी पक्षांत होते. भारतातील कोट्यवधी गरीब आणि शोषित जनतेला न्याय देण्याची जबाबदारी जेव्हा आली, तेव्हा विलक्षण एकजुटीने त्यांनी त्यासाठी प्रयत्न केले. हिंदू कोड बिलाच्या वेळीही ते डॉ. आंबेडकरांबरोबर होते; परंतु घटनासमितीत बहुसंख्य सदस्यांच्या विरोधांवर त्यांना मात करता आली नाही.

राज्यघटनासमितीसमोर राज्यरचनेच्या निर्मितीपेक्षा जास्त महत्त्वाचे आर्थिक-सामाजिक न्यायाचे आणि समता प्रस्थापित करण्याचे कठीण प्रश्न होते. म्हणूनच आपल्या राज्यघटनेच्या उद्देशपत्रिकेत सर्वंकष न्याय साध्य करण्यासाठी समता, स्वातंत्र्य, सर्वांना समान संधी आणि उत्पन्न प्रतिष्ठा, सन्मान आणि संपत्तीच्या 'न्याय्य' वितरणांशी जोडल्या गेल्या. त्यांच्या अंमलबजावणीच्या मार्गात दोन मोठे अडथळे होते. भारतातला समाज कर्मठ परंपरावादी, जातिव्यवस्थेचा समर्थक, विषमता आणि दारिद्र्याने ग्रस्त होता. हे दोष दूर केल्याशिवाय सामाजिक न्याय मागणे कठीण होते. त्यासाठी धर्मातील कालबाह्य रूढी आणि पोथीनिष्ठ कर्मठपणा दूर करणे आवश्यक होते. म्हणून धर्मनिरपेक्ष समाज आणि कारभार व अंमलबजावणीचे तत्त्व डॉ. आंबेडकरांनी मांडले. राज्यघटनेच्या वेगवेगळ्या तरतुदीतून म्हणजे प्रादेशिक नागरिकत्व (टेरीटोरियल नॅशनल सिटीझनशिप) मूलभूत हक्क, मार्गदर्शक तत्त्वे, मतदानाचे व निवडणुकीला उभे राहण्याचे अधिकार इ. यामधून त्यांनी धर्मनिरपेक्षतेची रचना केली. 'राष्ट्रीय नागरिकत्व' हीच संकल्पना लोकसमुदायाच्या धर्मवादी संरचनेला नाकारणारी गोष्ट होती. म्हणजे डॉ. आंबेडकरांनी ब्रिटिशप्रणीत, तसेच चातुर्वर्ण्याधिष्ठित धर्मवादी मोनोलिथ आणि इस्लामी धार्मिक-राजकीय अभिजनवर्गाच्या ग्रंथप्रामाण्यधिष्ठित धर्माच्या मोनोलिथला नाकारण्यासाठी धर्मनिरपेक्षतेचा सिद्धान्त स्वीकारावा ही गोष्टच प्रचंड क्रांतिकारी होती. म्हणून तर सध्याचे हिंदुत्ववादी धर्मनिरपेक्षतेवर हल्ला चढवीत आहेत.

दुसरी गोष्ट म्हणजे भारतांत प्रचंड बहुविधता असल्याने शेकडो प्रकारच्या अल्पसंख्य जमाती होत्या व आहेत अल्पसंख्याकत्वाच्या वसाहतवादी संकल्पनेमध्ये केवळ 'धार्मिक अल्पसंख्याकत्वा'चा विचार केला गेला होता.

त्यांतही इस्लामधर्मीय मुसलमानांना वेगळे काढण्यात आलेले होते. भारतात परिस्थिती गुंतागुंतीची होती. भारतांत भाषिक, प्रादेशिक, सांस्कृतिक, धार्मिक-सांप्रदायिक, वांशिक-भटक्या वन्य जाती, जमाती सर्वत्र विखुरलेल्या होत्या. त्या दारिद्र्य, मागासलेपणा आणि अत्याचाराने ग्रस्त होत्या. त्यांना आर्थिक-सामाजिक न्याय मिळणे आवश्यक होते. वेगवेगळ्या प्रदेशांत त्याची संख्या कमी-जास्त होती. ब्रिटिशांनी केवळ 'बिगर-हिंदू-धर्मीयांना अल्पसंख्याक' ठरविल्याने गुंतागुंत झाली होती. त्याला पर्याय म्हणून 'केवळ संख्येच्या आधारे अल्पसंख्याक' ठरविणेही अडचणीचे होते. कारण काही अल्पसंख्य जमाती खूपच सुधारलेल्या होत्या. सर्वांना एकच मोजपट्टी लावल्याने दरिद्री आणि मागासलेल्या अल्पसंख्याक भाषिक अल्पसंख्याकांच्या, तसेच अल्पसंख्याक जातींचा विचारच केलेला नव्हता. अल्पसंख्याकत्वाची वसाहतवादी संकल्पना धर्मावरच आधारित होती. मुळात धर्माचे मोनोलिथ (एकजिनसी बंदिस्त स्वरूप धर्म म्हणजेच लोकसमुदाय) ही संकल्पना सामाजिक मानववंशशास्त्रज्ञ आणि समाजातील मानवी व्यवहार-आचार-विचार (म्हणजे सोशल प्रॅक्टिस) यांच्या विरोधी आणि कल्पित होती.

ब्रिटिशांच्या कूटनीतीमुळे धर्म आणि अल्पसंख्याकत्व यांची सांगड घातली गेल्याने १९२२-२३ पासून हिंदू मुसलमानांत पडलेली फूट वाढतच गेली होती. बाकीच्या अल्पसंख्याकांचा विचार मागे पडला होता. परंतु भारत हा अनेक धर्मीय देश असल्याने धार्मिक अल्पसंख्याकांचाही विचार करणे स्वातंत्र्य आंदोलनाच्या काळापासूनच आवश्यक बनले होते. म्हणून लोकमान्य टिळकांनी स्वातंत्र्यपूर्व काळातच १९१६ साली बॅ. जीनांशी लखनौ करार करून तो प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न केला होता. परंतु धर्माच्या नावाखाली चाललेल्या हितसंबंधांच्या राजकारणामुळे तो संघर्ष वाढतच गेला. १९२८ साली हा संघर्ष मिटविण्यासाठी मोतीलाल नेहरू यांच्या अध्यक्षतेखाली अल्पसंख्याकांचा विचार करण्यासाठी 'नेहरू समिती' गठन करण्यात आली. त्यांनी अहवाल तयार केला. ब्रिटिशांच्या कूटनीतीमधून मार्ग काढणे आवश्यक होते. धार्मिक अल्पसंख्याकांचे प्रश्न सोडविणेही गरजेचे होते. त्याचबरोबर इतर अल्पसंख्याकांचाही विचार करावा लागणार होता. परिणामी 'अल्पसंख्याक' म्हणजे कोण हे नव्याने ठरविणेही कठीण होते 'अल्पसंख्याक' हा शब्द काढून टाकताही येणार नव्हता. म्हणून नेहरूंनी काही गोष्टी अध्याहृत (Implied) ठेवून धार्मिक अल्पसंख्याकांचे समाधान करण्याचे प्रयत्न केले. त्यांनी आपल्या अहवालात 'धार्मिक अल्पसंख्याक' हा शब्दप्रत्यय कोठेही वापरला नाही 'अल्पसंख्याकांचे संरक्षण' अशी तरतूद करणाऱ्या कलमात, 'अल्पसंख्याक' हा शब्द योजला. परंतु अल्पसंख्याकांची व्याख्या केली नाही. संघर्षही मिटले नाहीत.

पुन्हा १९४५ साली त्यासाठी तेजबहादूर सप्रू समिती स्थापन करण्यात आली. त्यांनीही आपल्या अहवालात अल्पसंख्याक म्हणजे कोण याची व्याख्या केली नाही, तर 'अल्पसंख्याक आयोगा'च्या स्थापनेची शिफारस केली. (संदर्भ : पी. एम. बक्षी - दि कान्स्टिट्यूशन ऑफ इंडिया, तेरावी आवृत्ती, युनिव्हर्सल लॉ पब्लिशिंग, नाशिक २०१६, पा.९१) आयोगाच्या स्थापनेच्या तरतुदीत 'अल्पसंख्याक' हा शब्द घातला!

राज्यघटनेचा मसुदा तयार करीत असताना डॉ. आंबेडकरांसमोर हा सर्व इतिहास होता. तसेच धर्माच्या नावाखालीच मुस्लिमांच्या वरिष्ठवर्गीय अशरफांनी फाळणी घडवून आणली होती. त्यानंतर धर्माच्या नावानेच भारतभर दंगली चालवलेल्या होत्या. लोकसमुदायांना धर्माच्या नावानेच बंदिस्त केल्यामुळे अराजक निर्माण झाले होते. लोकसमुदायांच्या धर्मकारी संरचनेला नाकारण्यासाठी डॉ. आंबेडकरांनी राज्यघटनेत धर्मनिरपेक्षतेचे (सेक्युलॅरिझम) तत्त्व आणले होते. त्यांत राजकारणातील धर्माचे प्राबल्य कमी करण्याचा प्रयत्न होता. म्हणून 'धार्मिक अल्पसंख्याक' अशी स्वतंत्र विभागणी त्यांनी केली नाही. त्याचबरोबर 'अल्पसंख्याक' म्हणून नागरिकांचा स्वतंत्र वर्ग ही राज्यघटनेत नमूद केला नाही. परंतु भारतांत अनेक प्रकारच्या अल्पसंख्याक जाती-जमाती होत्या. वेगवेगळे धार्मिक अल्पसंख्याकही होते व आहेत. त्यांना वगळताही येणार नव्हते. बहुविधता हे भारतीयत्वाचे लक्षण आहे. सामाजिक-आर्थिक न्यायात या सर्वांचा विचार होणे आवश्यक होते. हा गुंता सोडविण्यासाठी डॉ. आंबेडकरांनी एक विलक्षण रणनीती वापरली नव्हती. ती म्हणजे, त्यांनी राज्यघटनेच्या प्रत्यक्ष कलमात (अनुच्छेदांत) 'अल्पसंख्याक' हा शब्द टाकला नाही, तसे केल्यास भारतातल्या सर्व प्रकारचे अल्पसंख्याक नावासहित नमूद

करावे लागले असते. भारतात इतक्या प्रकारची बहुविधता आणि वेगवेगळ्या भागांत वेगवेगळे अल्पसंख्य आहेत की त्यामुळे ते अशक्यच होते. परंतु त्यांना वगळूनही चालणार नव्हते.

सांस्कृतिक-शैक्षणिक मूलभूत हक्काच्या अनुच्छेदाच्या 'समासात' (marginal role) 'अल्पसंख्याक' हा शब्द दिलेला आहे. परंतु अनुच्छेदाच्या प्रत्येक पाठात (text) नाही आणि २९ व्या कलमाच्या 'मथळ्या'त (title) 'अल्पसंख्याकांच्या हितसंबंधांचे रक्षण' असा शब्दप्रयोग करण्यात आला आहे. त्यामध्ये भारतातील सर्व प्रकारचे अल्पसंख्याक येतात. २९ व्या अनुच्छेदाप्रमाणे अल्पसंख्याकांच्या भाषा, लिपी, संस्कृती रक्षण करण्याचे अधिकार दिलेले आहेत. ३० त्या अनुच्छेदात शैक्षणिक संस्थासंबंधांचे अधिकार आहेत. ३०(१) मध्ये म्हटले आहे की धर्म आणि भाषेवर आधारित सर्व अल्पसंख्याकांना हा हक्क दिलेला आहे. १६ व्या अनुच्छेदातदेखील सर्व प्रकारच्या अल्पसंख्याकांना शासकीय नोकऱ्यांबाबतीत समान संधीचे तत्त्व आहे. (पी. एम. बक्षी, पान ८९, ९०, ३९) म्हणजे डॉ. आंबेडकरांनी 'धर्म' ही स्वतंत्र कसोटी नाकारली. म्हणजेच धर्माचे मोनोलिथ नाकारले. परंतु त्याचबरोबर सर्व प्रकारच्या अल्पसंख्याकांना आर्थिक-सामाजिक सांस्कृतिक न्यायाचे अधिकार दिले.

त्यांच्या विकास आणि सबलीकरणासाठी 'धर्म किंवा अल्पसंख्य' या कसोटीऐवजी 'मागासलेले पुढील घटक' ही कसोटी लावली. आर्थिकदृष्ट्या दुर्बल आणि सामाजिकदृष्ट्या मागासलेल्या वर्गासाठी विशेष प्रयत्न करण्यासाठी सूचना दिली आहे. त्यात बिगरहिंदू धार्मिक अल्पसंख्याकही येतात आणि हिंदूमधील भाषिक-जातीय प्रादेशिक अल्पसंख्याकही येतात. डॉ. आंबेडकरांनी 'राज्यांचे आणि अल्पसंख्याकांचे हक्क'संबंधीच्या मेमोरंडममध्ये घटनासमितीच्या मूलभूत हक्कांविषयीच्या उपसमितीला अहवाल सादर करीत असताना म्हटले होते की, भारतातल्या अल्पसंख्याकांच्या दुर्दैवाने भारतीय राष्ट्रवादाने एक नवीन सिद्धान्त विकसित केला आहे, तो म्हणजे आपल्या इच्छेप्रमाणे अल्पसंख्याकांवर राज्य करण्याचा 'बहुसंख्याकांच्या इच्छेचा' दैवी सिद्धान्त होय (ए. जी. नुरानी, कॉन्स्टिट्यूशन अँड सेक्युलॅरिझम, फ्रंटलाईन, २२ जाने. २०१६, पा. ६४.)

वरील सर्व तरतुदींचा आणि राज्यघटनेतील अनुच्छेद ३४०(१) चा आधार घेऊन बी. पी. मंडल आयोगाने आपल्या अहवालात हिंदूसहित, भारतातील इतर धर्मीयांतील मागासलेले आणि आर्थिक दुर्बल घटक यांच्या सबलीकरणाच्या शिफारशी केल्या होत्या. सर्व प्रकारच्या अल्पसंख्याकांना आर्थिक-सामाजिक न्याय हे आपल्या राज्यघटनेचे उद्दिष्ट आहे. या सर्व तरतुदींतून असे कोठेही म्हटलेले किंवा सूचित केलेले नाही की मुस्लीम किंवा ख्रिश्चन हे बिगरहिंदू धर्माचे असल्याने त्यांच्या विकासाच्या स्वतंत्र तरतुदी करता येत नाहीत किंवा वरील तरतुदींचा असाही अर्थ होत नाही की नोकऱ्या, शिक्षण, सबलीकरणाच्या तरतुदी आणि घटनात्मक सवलती व उपाय केवळ हिंदू आणि हिंदूमधील जातींनाच आहेत, मुस्लिमांना आणि ख्रिश्चनांना आरक्षण देता येत नाही, राज्यघटनेने ते दिलेले नाही, हे हिंदुत्ववाद्यांचे म्हणणे आणि प्रचार केवळ चुकीचा नाही, तर घटनाविरोधी आहे. मुस्लिमांना आणि ख्रिश्चनांना 'धर्माची कसोटी' हिंदुत्ववादी लावत आहेत. डॉ. आंबेडकरांनी आणि त्यांच्या राज्यघटनेत लावलेली नाही!

वरील सर्व तरतुदींच्या विवेचनावरून डॉ. आंबेडकरांची अल्पसंख्याकांसंबंधीची संकल्पना आणि त्यांच्या सबलीकरणासंबंधीची भूमिका स्पष्ट होते. मुळात डॉ. आंबेडकरांनी 'अल्पसंख्याक' हे धर्मावरून ठरविलेले नाहीत. त्यांनी अल्पसंख्याकांचा वसाहतवादी सिद्धान्त पूर्णपणे नाकारला आहे. सर्वप्रथम राज्यघटनेची उद्देशपत्रिका, मूलभूत हक्क, मार्गदर्शक तत्त्वे यामधून लोकशाहीची आधारभूत तत्त्वे म्हणून व्यक्तिगत राजकीय, सामाजिक, आर्थिक हक्कांची मांडणी केली आहे. ते करीत असताना न्याय, स्वातंत्र्य, समता, समान संधी ही तत्त्वे 'नागरिकांसाठी' साध्य करण्याचे उद्दिष्ट घोषित केले आहे. म्हणजे वरील सर्व तरतुदींतून व्यक्त होणारे हक्क आणि न्यायाचे उपाय हे फक्त 'भारतीय नागरिकांना'च आहेत. तुम्ही भारताचे नागरिक असाल तर ती तुम्हाला प्राप्त होतात. अल्पसंख्य आहात किंवा एका विशिष्ट धर्माचे आहात म्हणून नव्हे! कलम १६, २५ ते २८, २९, ३० या सर्वांमधून 'नागरिकांनाच' अधिकार दिलेले आहेत. मुस्लीम जर भारताचे नैसर्गिक नागरिक असतील तर ते त्यांनाही लागू होतात. ८५% भारतीय मुसलमान आणि ९५% भारतीय ख्रिश्चन हे पूर्वाश्रमींच्या शूद्र आणि अतिशूद्र आणि इतर मागास हिंदू जाती-जमाती आहेत. ते

स्थलांतरित (डायसफोरिक) नाहीत. स्थलांतरितांचे वंशज पाकिस्तानात गेले आहेत. अँग्लो-इंडियन नसल्यातच जमा आहेत. तेव्हा त्यांना वरील तरतुदी, आरक्षण, सवलती लागू आहेत.

दुसरी गोष्ट म्हणजे, डॉ. आंबेडकरांनी 'अल्पसंख्याक' हे 'धर्माच्या कसोटीवरून' किंवा 'अल्पसंख्य असण्याच्या' कसोटीवरून न ठरविता 'आर्थिक-सामाजिकदृष्ट्या मागासलेले आणि दुर्बल घटक' यावरून ठरविले आहेत. अनुसूचित जातीविषयी लिहीत असताना, त्याविषयीच्या तयार केलेल्या 'मेमोरंडम'च्या प्रास्ताविकात त्यांनी म्हटले आहे की, भारतातल्या उच्च आणि शक्तिशाली बहुसंख्याकांनी अनुसूचित जाती (Scheduled Castes) हे अल्पसंख्याक नाहीत, अशी नवीन मांडणी केली आहे. (माझी टीप - याचा अर्थ असा की, घटनासमिती धर्माच्या कसोटीवरून अल्पसंख्याकाची व्याख्या करीत होती.) डॉ. आंबेडकर म्हणतात की, अनुसूचित जाती अल्पसंख्याकांपेक्षा जास्त दुबळ्या (more than minority) आहेत. म्हणजे ते इथेही धर्माची कसोटी नाकारतात. आपल्या मेमोरंडमच्या कलम II, विभाग IV मधील सातव्या मुद्द्यात म्हणतात की, धर्मातील निराळेपण ही अल्पसंख्याकत्वाची कसोटी होत नाही, त्यापेक्षा 'सामाजिक भेदभाव' ही एकदा लोकसमुदाय अल्पसंख्याक आहे की नाही, हे ठरविणारी खरी कसोटी आहे. (पा. ४२२, स्टेट्स अँड मायनॉरिटीज Vol. I) पुढे त्यांनी म्हटले आहे की, घटनात्मक संरक्षणासाठी धार्मिक कसोटी लावणे म्हणजे भेदभाव आणि विषमतेकडे दुर्लक्ष करणे होय.

भारतातल्या हिंदू बहुसंख्याकांचे वर्णन करीत असताना त्यांनी म्हटले आहे की, ब्रिटिश कॅबिनेट पद्धती राजकीय बहुसंख्याकाच्या तत्त्वावर आधारित आहे. परंतु भारतांतील बहुसंख्य ही राजकीय नसून कम्युन आहे/ त्यांच्या सामाजिक व राजकीय कार्यक्रम काहीही असो, बहुसंख्य जनता, आपली 'कम्युन मेजॉरिटी' सोडणार नाही. त्यांच्यावर अल्पसंख्याकांना प्रतिनिधित्व देणे बंधनकारक होत नाही. परिणामी, अशी ब्रिटिश पद्धती ही जीविताचा हक्क, स्वातंत्र्य आणि सुखकर जीवनाच्या शोधाला मारक-धोकादायक ठरेल. अस्पृश्यांना तर विशेष धोकादायक आहे. (डॉ. आंबेडकर, खंड पहिला, स्टेट्स अँड मॉयनारिटीज, पा. ४१३ आणि ४२२.)

त्यांनी अल्पसंख्याकाची व्याख्या सामाजिक न्यायाच्या आणि प्रादेशिक (टेरीटोरीयल) नागरिकत्वाच्या कसोटीवरून, धर्माऐवजी ते मागासलेले आणि दुर्बल समानघटक आहेत का, यावरून तसेच ते सामाजिक भेदभाव आणि वेगळे काढले गेले आहेत का, यावरून केली आहे. त्यांच्या दृष्टीने अल्पसंख्याक म्हणजे पीडित, शोषित अत्याचाराला बळी पडणारे, दरिद्री, मागासलेले लोकसमुदाय होत. त्यामध्ये सर्व प्रकारच्या भाषिक धार्मिक-सांस्कृतिक, प्रादेशिक जाती-जमाती येतातच म्हणून त्यांना कलम १६, २५ ते २८, २९, ३० मधून संरक्षण दिले गेले. एवढ्याने अनुसूचित जातींचे प्रश्न मिटणार नाही, म्हणून त्यांच्यासाठी विशेष तरतुदी केल्या गेल्या आहेत.

सध्या आपल्या भारतात राष्ट्रवादाच्या नावाने बहुसंख्याकांचा जमातवाद प्रचंड मोठ्या प्रमाणात वाढला आहे. साऱ्या वातावरणात एक प्रकारची दहशत भरून राहिली आहे. असं म्हटलं जातं की, बहुसंख्याकांचा जमातवाद हा अल्पसंख्याकांच्या धर्मवाद आणि जमातवाद यांची प्रतिक्रिया आहे. आपल्या मेमोरंडममध्ये डॉ. आंबेडकरांनी एक गंभीर स्वरूपाचे तथ्य सांगितले आहे. त्याची आठवण ताजी झाली आहे. ते म्हणजे, त्यांनी म्हटले आहे की, ब्रिटिश कॅबिनेट पद्धतीतील 'मेजॉरिटी' ही राजकीय मेजॉरिटी असते. परंतु भारतातील 'मेजॉरिटी' (बहुसंख्याक) ही कम्युनल म्हणजे जमातवादी मेजॉरिटी आहे! त्यात बदल होणे कठीण आहे. (म्हणून कॅबिनेट पद्धती भारतात योग्य नाही) १९८९ च्या दंगली, १९९२ च्या वेळी झालेली हत्याकांडे, २००२ चा गुजरातमधील नरसंहार, २०१४ च्या निवडणुकांच्या तोंडावर मतांच्या ध्रुवीकरणासाठी घडविल्या गेलेल्या दंगली हरियाणा, उत्तरप्रदेश, राजस्थान, मध्यप्रदेश, बिहार, महाराष्ट्र, कर्नाटक इत्यादी राज्यांत उफाळून आलेला दंगलखोर जमातवाद या घटना केवळ प्रतिक्रियात्मक नाहीत, तर तो मेजॉरिटीतच असल्याने भाजपच्या हस्ते संघपरिवारांना सत्ता मिळविणे शक्य झाले आहे. या जुलमी मेजॉरिटीपासून अल्पसंख्याकांच्या संरक्षणासाठी त्याच 'मेमोरंडम'मध्ये डॉ. आंबेडकरांनी काही महत्त्वाचे उपाय सुचविले होते. घटना समितीने ते स्वीकारलेले नाहीत! त्याबद्दल नंतर कधीतरी! ●